ePaper
महाराष्ट्रासमोर मोठं संकट; पाणीसाठ्याची धक्कादायक आकडेवारी

वर्ष - 7 । अंक - 136 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 18 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत

- भारताचा आशिया चषकावर सि'राज'!
- रुबिना दिलायक होणार आहे आई
- काँग्रेसला 5 राज्यांत बहुमताचा विश्वास!
- मी फडणवीसांना मदत केली : खडसे

### उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या 'बालेकिल्ल्यात

# जयंत पाटलांचा 'सुरुंग'!

### » सांगलीतील आव्हानाला पिंपरी-चिंचवडमध्ये जशास तसे उत्तर

## » पिंपरीत खा. शरद पवार गटाच्या सक्षमीकरणासाठी पुढाकार

।पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।

**काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पेठ नाका (ता. वाळवा, जि. सांगली) येथे सभा घेतली. या ठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे (खा. शरद पवार गट) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या विरोधकांना ताकद देणार असल्याचे वक्तव्य अजित पवारांनी केले होते. उपमुख्यमंत्री पवारांनी दिलेल्या आव्हानाला जशास तसे उत्तर देण्याचे काम जयंत पाटील यांनी केले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी चिंचवड शहरात पवार समर्थक असलेले माजी नगरसेवक तुषार कामठे यांनाच जयंत पाटील यांनी गळाला लावले आहे. कामठे यांना पिंपरी चिंचवड राष्ट्रवादीची (खा. शरद पवार गट) जबाबदारी दिली आहे.**



कामठे यांना काल शनिवारी (दि. 16) नियुक्ती पत्र देखील दिले आहे. तसेच शहरात लवकरच राष्ट्रवादीचे भव्य कार्यालय सुरु करून त्याचे खासदार शरद पवार यांच्या उपस्थितीत आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या पुढाकाराने उद्घाटन देखील करण्यात येणार आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या बालेकिल्ल्यात जाऊन 'करेक्ट' कार्यक्रम करण्याला जयंत पाटील यांनी सुरुवात केल्याचे हे सुतोवाच असल्याचे बोलले जात आहे. 2 जुलै २०२३ रोजी अजित पवार हे समर्थक आमदारांसह शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाले. अजितदादा सरकारमध्ये सहभागी झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड शहरातील संपूर्ण पक्ष संघटना त्यांच्यासोबत गेली आहे. मात्र नव्याने कार्यकर्ते, पदाधिकारी तयार करायला प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सुरुवात केली आहे. अजित पवार यांच्या विरोधात एक शब्दही न काढणाऱ्या बालेकिल्ल्यालाच जयंत पाटील यांनी सुरुंग लावला आहे. खासदार शरद पवार यांच्या विचारांचे पदाधिकारी तयार करण्याकडे पाटील यांनी लक्ष दिले आहे. त्याचाच एक भाग म्हणून शहराध्यक्षपदी अजित पवार समर्थक माजी नगरसेवकच फोडण्याचे काम पाटील यांनी केले आहे. शहराध्यक्ष पदासाठी पाच माजी नगरसेवकांनी मुलाखती दिल्याची चर्चा आहे. त्यामध्ये माजी नगरसेवक तुषार कामठे यांच्या गळ्यात शहराध्यक्ष पदाची माळ पडली. जयंत पाटील यांनी शहरात येणाऱ्या पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तीनही मतदारसंघात निरीक्षक नेमून त्यांना ताकद दिली आहे. पश्चिम महाराष्ट्रात सांगली आणि कोल्हापुर जिल्ह्यात राष्ट्रवादीची मोठी ताकद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लाटेत देखील कोल्हापूर जिल्हा भाजपमुक्त ठेवण्याचे काम राष्ट्रवादीने केले. तर सांगली जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या पाठिशी अबाधित ठेवण्यात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना यश आले. पुणे जिल्ह्यामध्ये विशेषतः पिंपरी-चिंचवडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे एकमेवळ नेतृत्त्व असल्याचे चित्र होते. मात्र त्याला छेद देण्याचे काम जयंत पाटील यांनी माजी नगरसेवक तुषार कामठे यांच्या निमित्ताने केले आहे. कामठे यांनी राष्ट्रवादीतील 60 टक्के नगरसेवक आपल्यासोबत असल्याचा दावा केला आहे. कामठे हे स्थानिक नेतृत्त्व आहे. मराठा समाजाचा चेहरा आहे. त्यांना प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिलेली ताकद ही आगामी काळात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची डोकेदुखी वाढविणार असल्याची राजकीय वस्तूस्थिती आहे.

## कार्यालयाच्या उद्घाटनाची जोरदार तयारी

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बालेकिल्ला असलेल्या पिंपरी-चिंचवड शहरात आता शरद पवार गटाने पक्ष कार्यालय थाटले आहे. राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसने काळेवाडी येथे पक्ष कार्यालय उभारले असून पक्षाध्यक्ष खा. शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते उद्घाटनाची जोरदार तयारी करण्यात आली आहे. या कार्यालय परिसरात मोठ्या प्रमाणात फ्लेक्स लावण्यात आले आहेत. या फ्लेक्समधून उपमुख्यमंत्री अजित पवारांचा फोटो वगळण्यात आला आहे. खा. शरद पवार आणि जयंत पाटलांचा फोटो लावण्यात आला आहे. कार्यालय उभारुन शरद पवार गटाने पक्षबांधणीला सुरुवात केली आहे.

## कामठे विधानसभेवर दावा करणार ?

» माजी नगरसेवक कामठे यांचा प्रभाग चिंचवड विधानसभेत येतो. सध्या या मतदारसंघातून भाजपाच्या अश्विनी जगताप विद्यमान आमदार आहेत. महायुतीमध्ये हा मतदारसंघ विधानसभेला भाजपासाठी सोडला जाणार हे निश्चित. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार गट, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला भाजपाच्या उमेदवाराचा प्रचार करावा लागणार आहे. त्यामुळे त्यांच्याविरोधात खा. शरद पवार गटाच्या राष्ट्रवादीचा उमेदवार असणार हे निश्चित आहे. ही संधी ओळखून कामठे यांनी देखील उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा रोष अंगावर घेऊन शहराध्यक्ष पद घेतलेच. मात्र आगामी निवडणूकीत चिंचवड विधानसभेसाठी देखील ते दावा करतील, असा अंदाज आहे.

---

## पिंपरी 'आरटीओ'कडून वाहन चालकांचा सन्मान

### वाहन चालक दिनानिमित्त चाकण येथे कार्यक्रम

।पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने वाहन चालक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महिंद्रा लॉजिस्टिक चाकण येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी शहरातील चालकांना पुष्प देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. विविध ठिकाणी जाऊन वाहन चालकांना त्यांची समाजातील महत्वाची भूमिका कशी आणि का आहे? या बाबत मार्गदर्शन केले. महिंद्रा लॉजिस्टिक्स चाकण व प्रादेशिक परिवहन कार्यालय पिंपरी-चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महिंद्रा लॉजिस्टिक्स मॅनेजिंग डायरेक्टर राम, नरेश गोयत, निंबा भामरे ऑपरेशन, विजय भापकर मेडिकल टीम या वेळी उपस्थित होते.



## वाहनचालकांची आरोग्य तपासणी...

» संपूर्ण भारतभर महिंद्रा उत्पादित वाहनांची डिलिव्हरी देणे व विविध भागातून सुटे पार्ट महिंद्रा लॉजिस्टिक चाकण येथे वाहतूक करणाऱ्या 250 वाहन चालकांना गुलाब पुष्प व शुभेच्छा देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच चालक दिनानिमित्त उपस्थित वाहन चालकांचे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. 88 वाहनचालकांनी आरोग्य तपासणी करून घेतली.

# राज्यात महिलांवरील अत्याचारात वाढ!

## हिंसाचारात वाढ मुंबई पहिल्या तर पुणे दुसऱ्या स्थानावर

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**महिलासंदर्भातील गुन्हे सातत्याने नोंदवल्या जात असून महिलांवर बलात्कार, विनयभंग, अपहरण आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. राज्यात महिला-तरुणींचा विनयभंग आणि छेडखानीचे सर्वाधिक गुन्हे मुंबईत नोंदवले गेले असून त्या पाठोपाठ पुणे आणि नागपूर शहराचा क्रमांक आहे.**

त्यामुळे राज्यात महिला सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. ही धक्कादायक आकडेवारी महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावरून समोर आली आहे. शिंदे-फडणवीस-पवार सरकारने महिला सुरक्षेला प्राधान्य देण्याचा दावा केला होता. परंतु, राज्यातील महिलांवरील वाढते लैंगिक अत्याचार आणि विनयभंग, छेडखानीच्या घटना लक्षात घेता सरकारचा दावा फोल ठरत आहे. मुंबईत अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत महिलांच्या विनयभंगाच्या गुन्ह्यांत चौपट वाढ झाली आहे. गेल्या आठ महिन्यांत राज्यात मुंबईत विनयभंग, छेडखानीच्या १ हजार २५४ घटना घडल्या आहेत. अन्य शहरांच्या तुलनेत हे प्रमाण चारपटीने जास्त आहे. याच कालावधीत ५४९ महिला-तरुणींवर बलात्कार झाल्याच्या गुन्ह्याची नोंद मुंबई पोलिसांनी केली आहे. तसेच कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळीसारख्या गुन्ह्याच्या घटनांमध्येसुद्धा दुप्पट वाढ झाली आहे. पुण्यात छेडखानी




केल्याच्या ३६४ घटना घडल्या आहेत, तर १२४ महिलांवर बलात्काराचे केल्याचे गुन्हे दाखल आहेत. मुंबईनंतर राज्यात पुण्यात सर्वाधिक महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचे उघडकीस आले आहे. गृहमंत्र्यांचे शहर नागपुरातही महिला सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे समोर आले आहे. गेल्या आठ महिन्यांत ३०४ तरुणी-महिलांच्या छेडखानीच्या घटना घडल्या आहेत. तर १६५ महिलांवर बलात्काराच्या घटना घडल्या आहेत. तीनेशवर मुली आणि तरुणींना फूस लावून किंवा वेगवेगळी आमिषे दाखवून पळवून नेल्याच्या घटना घडल्या आहेत. विनयभंग, शेरेबाजी किंवा छेडखानीच्या गुन्ह्यातील पीडितांमध्ये शाळकरी आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. टवाळखोर आणि टारगट युवकांचा विनयभंगाच्या आरोपींमध्ये मोठ्या संख्येने समावेश आहे. तसेच नातेवाईक आणि कुटुंबातील सदस्यांवरही विनयभंगाचे गुन्हे दाखल झाले आहेत. पोलीस ठाण्यात आलेल्या विनयभंगाच्या तक्रारी पोलीस दाखलच करतात असे नाही. समाजात बदनामी होण्याची भीती दाखवून पोलीस गुन्हा दाखल करण्यापासून तरुणींना परावृत्त करतात. अनेकदा असे गुन्हे दाखल करण्यास पोलीस टाळाटाळ करतात, अशी माहिती समोर आली आहे.

### पुण्यात छेडखानी केल्याच्या 364 घटना

पुण्यात छेडखानी केल्याच्या ३६४ घटना घडल्या आहेत, तर १२४ महिलांवर बलात्काराचे केल्याचे गुन्हे दाखल आहेत. मुंबईनंतर राज्यात पुण्यात सर्वाधिक महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचे उघडकीस आले आहे. गृहमंत्र्यांचे शहर नागपुरातही महिला सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे समोर आले आहे. गेल्या आठ महिन्यांत ३०४ तरुणी-महिलांच्या छेडखानीच्या घटना घडल्या आहेत. तर १६५ महिलांवर बलात्काराच्या घटना घडल्या आहेत. तीनेशवर मुली आणि तरुणींना फूस लावून किंवा वेगवेगळी आमिषे दाखवून पळवून नेल्याच्या घटना घडल्या आहेत.


> राज्यात महिलांवरील लैंगिक अत्याचाराच्या प्रमाणात वाढ होणे गंभीर आहे. बलात्कार-विनयभंगाच्या प्रकरणांची राज्य महिला आयोग तातडीने दखल घेते. पोलीस विभागाने गांभीर्य दाखवून कायद्याची कडक अंमलबजावणी करावी. जेणेकरून येत्या काळात महिलांमध्ये सुरक्षितेची भावना निर्माण होईल.
>
> **– आभा पांडे,** सदस्य, राज्य महिला आयोग.

# गणेशोत्सवात गावी जाण्याची लगबग

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक संथ

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक संथ झाली असून, गणेशोत्सवानिमित्त मोठ्या संख्येने नागरिक मूळगावी निघाल्याने वाहतुकीचा वेग कमालीचा संथ झाला. गणेशोत्सवानिमित्त मुंबई, नवी मुंबई, ठाणे भागातील अनेकजण मूळगावी जातात. कोकण, तसेच कोल्हापूर, सांगली, सातारा भागात जाणारे नागरिक मोटारीतून मूळगावी निघाले.**



द्रुतगती मार्गावर मोठ्या संख्येने मोटारी आल्याने वाहतूक संथ झाली. आडोशी बोगदा ते खंडाळा (एक्झिट) वाहतूक विस्कळीत झाली होती. घाटक्षेत्रात वाहतूक संथगतीने सुरू असल्याने कोंडी सोडविण्यासाठी खंडाळा महामार्ग पोलीस, बोरघाट पोलिसांचे पथकाकडून काम सुरू होते. शनिवारी सायंकाळपासून द्रुतगती मार्गावरील वाहतूक संथ झाल्याची माहिती महामार्ग पोलिसांनी दिली. गणेशोत्सवानिमित्त मूळगावी निघालेल्या नागरिकांना टोलमाफीची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. पोलीस ठाण्यातून वाहनांना तात्पुरत्या स्वरुपाचे टोलमाफी परवाने दिले जात आहेत. लोणावळा शहर पोलीस ठाण्यात परवाने उपलब्ध असल्याची माहिती लोणावळा शहर पोलिसांनी दिली.

### टोलमाफीची घोषणा

गणेशोत्सवानिमित्त मूळगावी निघालेल्या नागरिकांना टोलमाफीची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. द्रुतगती मार्गावर मोठ्या संख्येने मोटारी आल्याने वाहतूक संथ झाली. आडोशी बोगदा ते खंडाळा (एक्झिट) वाहतूक विस्कळीत झाली होती. घाटक्षेत्रात वाहतूक संथगतीने सुरू असल्याने कोंडी सोडविण्यासाठी खंडाळा महामार्ग पोलीस, बोरघाट पोलिसांचे पथकाकडून काम सुरू होते. शनिवारी सायंकाळपासून द्रुतगती मार्गावरील वाहतूक संथ झाल्याची माहिती महामार्ग पोलिसांनी दिली.

# श्रीनगर मध्ये पुण्यातील बाप्पा!

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

भारतीय सैन्य हे सीमेवर नेहमीच तत्पर असते. सातत्याने कर्तव्यावर असणाऱ्या जवानांना घरातील सन, उत्सव यांपासून नेहमीच दूर राहावे लागते. परंतु त्यांना देखील हे सन उत्सव साजरे करावेसे वाटतात, हाच धागा पकडून वंदेमातरम् संघटना, युवा फिनिक्स सोसायटी व सरहद संस्थेच्या वतीने काश्मीर मधील जावानांची खास भेट घेवून त्यांना दिवाळी फराळाचे वाटप तसेच गणपतीबाप्पाची मूर्ती आणि शंकर महाराज यांची प्रतिकृती भेट स्वरूपात देण्यात आली. यावेळी वंदे मातरम् संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष सचिन जामगे, प्रदेशाध्यक्ष वैभव वाघ, पुणे शहर विद्यार्थी कार्याध्यक्ष अमोल जगताप, संपर्कप्रमुख प्रसाद कुलकर्णी, तसेच स्थानिक बांधव उपस्थित होते. यावेळी बोलताना वंदे मातरम संघटनेचे कार्याध्यक्ष सचिन जामगे म्हणाले, बाहेरील शत्रूला नामोहरम करण्यासाठी आपले जवान हे नेहमीच सज्ज असतात. देशात शांतता ही सैन्यदलामुळेच टिकून आहे. सैन्यातील प्रत्येक सैनिक दक्ष असल्याने आपल्याला सन, उत्सव, आनंदाने साजरे करता येतात. म्हणूनच यावर्षी देखील नेहमीप्रमाणे आम्ही सैनिकांना गणेशोत्सवाच्या पूर्वीच दिवाळीचा फराळ घेवून आलो आहोत. सैनिक हे सीमेवर प्राणांची आहुती देण्यासाठी कायम सज्ज असतात. त्यामुळे त्यांना एक विशेष मान आहे. त्यांच्यामुळेच भारतामध्ये शांती नांदत आहे, अशा वीर जवानांच्या सोबत आम्ही खंबीरपणे उभे आहोत, हे त्यांना दाखविण्यासाठी आम्ही, या उपक्रमाचे आयोजन केले.

# ...तर, तुमच्या यशाचा गाजावाजा जग करेल!

## पं. प्रदीप मिश्रा : भाविकांना दिला भक्ती आणि मेहनतीचा मूलमंत्र

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"भक्ती किंवा मेहनत या दोन्ही गोष्टी गाजावाजा न करता करण्याच्या आहेत. लोकांना जर ओरडून सांगावे लागणार असेल, की मी भक्ती करत आहे. तर तुम्हाला मिळणारे फळ देखील त्या दर्जाचे नसणार हे निश्चित. यासाठी भक्ती आणि मेहनत शांतपणे करा म्हणजे तुम्हाला मिळणाऱ्या यशाचा गाजावाजा जग करेल, असा मूलमंत्र पं. प्रदीपजी मिश्रा यांनी आज आपल्या कथेच्या माध्यमातून दिला.**



लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्रपरिवार यांच्या वतीने पीडब्ल्यूडी मैदान, सांगवी येथे श्री अष्टविनायक शिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप हे मुख्य निमंत्रक आहेत. आज कथेच्या वेळी भारतीय जनता पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. भक्तीमध्ये विश्वास नसेल तर परमात्माशी भेट होणे अवघड आहे. तुम्ही कुणाचीही भक्ती करा, परंतू भक्ती करताना मनामध्ये त्या शक्तीसाठी, परमात्म्याप्रती विश्वासाची पेरणी करा. परमात्मा आणि तुमच्यात विश्वासाचा बंध निर्माण झाल्या नंतरच तुम्हाला परमात्मा भेटू शकेल, असे भक्तीजीवनाचे सार प्रदीपजी मिश्रा यांनी उपस्थित भाविकांना उलघडून दाखविले.



### तुम्ही मनातून परमात्म्याशी संवाद साधू शकाल...

जेव्हा तुमच्या मनात परमात्म्याशी संवाद साधण्याची इच्छा असेल तेव्हा तुम्ही संवाद साधू शकता. परमात्म्याने नामस्मरण करण्यासाठी कोणतीही वेळ निर्धारित केलेली नाही. अनेकदा आपण नित्यनियमाने सकाळी पूजाअर्चा करतो. मात्र, यांत्रिकपणे या गोष्टी करण्यापेक्षा मनाला योग्य वाटेल त्यावेळी परमात्म्याचे केवळ नामस्मरण करा, हीच खरी भक्ती आहे. यातूनच तुम्ही मनातून परमात्म्याशी संवाद साधू शकाल, असे कथेचे सार सांगताना पं. प्रदीपजी मिश्रा यांनी सांगितले.

---

# स्वातंत्र्य सेनानींचा लढा प्रेरणादायी!

## शेखर काटे : मराठवाडा मुक्तिसंग्रामच्या आठवणींना उजाळा

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठवाडा मुक्तिसंग्रामच्या लढ्याला भारतीय स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा होती. निजामाच्या अन्यायी जुलमी सत्तेविरूद्ध जनतेने दिलेले हा लोकलढा होता. या लढ्यात विविध जाती-धर्माच्या लोकांनी बलिदान दिले. मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्य सेनानींनी दिलेला लढा आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी व स्फूर्तीदायी असल्याचे मत राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे शहराध्यक्ष (उपमुख्यमंत्री अजित पवार गट) शेखर काटे यांनी व्यक्त केले.**



राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. खराळवाडी येथील पक्ष कार्यालयात व्याख्याते नितीन चिलवंत यांनी आपल्या मार्गदर्शनातून मराठवाडा मुक्ती संग्रामातील लढ्याचे यथोचित वर्णन केले. या वेळी आयोजित कार्यक्रमात शेखर काटे बोलत होते.

या वेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी नगरसेवक राहुल भोसले, ॲड. गोरक्ष लोखंडे, प्रसाद कोलते, तुषार ताम्हाणे, रविंद्र सोनवणे, रजनी गोसावी, मनीषा गटकळ आदीसह राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

काटे म्हणाले की, मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास हा अतिशय ज्वलंत आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात इतका मराठवाडा मुक्तिसंग्राम ही महत्वपूर्ण आहे. मुक्तिसंग्राम यामुळे हैदराबाद संस्थान निजामाच्या राजवटीतून मुक्त झाल्याने भारतीय स्वातंत्र्याला पूर्णत्व मिळाले, असे प्रतिपादन शेखर काटे यांनी केले.

---

# ग्वांगझू अवॉर्डच्या शहरी इनोव्हेशनमध्ये पिंपरी चिंचवडचा समावेश

। पिंपरी । महाईन्यूज ।

६ व्या ग्वांगझू इंटरनॅशनल अवॉर्ड फॉर अर्बन इनोव्हेशन (ग्वांगझू अवॉर्ड)च्या १५ अंतिम शहरांच्या यादीत पिंपरी चिंचवड शहराचा समावेश करण्यात आला आहे. "ग्वांगझू अवॉर्ड" साठी भारतीय शहरांमधून पिंपरी चिंचवड हे एकमेव शहर ठरले आहे, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली आहे. सन २०१२ पासून सिटी ऑफ ग्वांगझू, युसीएलजी आणि मेट्रोपोलिसद्वारे सह-प्रायोजित शहरी नवोपक्रमासाठी ग्वांगझू इंटरनॅशनल अवॉर्ड (Guangzhou Award) देण्यात येत आहे. ज्ञान निर्मितीला चालना देण्यासाठी आणि शहरी नावीन्यतेमध्ये शिक्षण सुलभ करण्यासाठी जागतिक व्यासपीठ म्हणून ही संकल्पना उदयास आली आहे. गेल्या पाच टप्प्यांमधून जगभरात १३०० हून अधिक उपक्रम सादर करण्यात आले आहेत. परिवर्तनशील शहरी विकास पद्धतींना यामधून प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्यात येत आहे. या उपक्रमात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने देखील सहभाग नोंदविला होता.भारतातून पिंपरी चिंचवड हे एकमेव शहर आहे. तसेच, अंतल्या (तुर्किये), बोगोटा (कोलंबिया), केप टाउन (दक्षिण आफ्रिका), ग्वांगजू (कोरिया), हलांद्री (ग्रीस), इज्तापालापा (मेक्सिको), जकार्ता (इंडोनेशिया), कंपाला (युगांडा), कझान (रशिया), मॅनहाइम (जर्मनी), रामल्लाह (पॅलेस्टाईन) साओ पाउलो (ब्राझील), तेहरान (इराण) आणि झियानिंग (चीन) ही सर्व शहरे जगभरातील शहरी नवकल्पनांचे प्रतिनिधित्व करीत आहेत.




# ‘एका’च्या बडेजावाची शिखर परिषद!

**आपल्याकडे जी-ट्वेंटीचे अध्यक्षपद होते, म्हणजे आपण खूप मोठे काही तरी मिळवले असे चित्र सरकारने गेले वर्षभर सतत रंगवले. नुकत्याच झालेल्या दिल्लीतील जी-ट्वेंटी शिखर परिषदेत तर या सगळ्याचा कळस गाठल्याचे बघायला मिळाले पंतप्रधान नरेंद्र मोदी हे एक अत्यंत कुशल ‘शोमन’ आहेत.**




जी- ट्वेंटी शिखर परिषदेत जागतिक नेत्यांच्या उपस्थितीत ते अत्यंत आत्मविश्वासाने वावरताना दिसत होते. त्यांच्या भाषणात एकही वावगा शब्द जाऊ नये यासाठी त्यांची टीम त्यांचे भाषण अत्यंत काळजीपूर्वक तयार करते. आणि इतर कोणत्याही मंत्र्याला एक इंचही जागा न देता कॅमेऱ्याची फ्रेम कशी व्यापायची हे त्यांना एकदम नीट माहीत आहे. पंतप्रधानांनी त्यांच्या सवयीनुसार माध्यमांपासून अंतर राखले. फक्त ते स्वत:च माध्यमांपासून दूर राहिले असे झाले नाही, तर अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन हेदेखील कोणत्याही पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरे देणार नाही, असेदेखील मोदींच्या सरकारने पाहिले. त्यामुळे निराश झालेल्या अमेरिकी यंत्रणेने बायडेन भारतातून निघाल्यावर त्यांच्या पुढच्या मुक्कामी, व्हिएतनाम येथे जी ट्वेंटी बैठकीसंदर्भातील प्रश्नांची उत्तरे देतील, असे जाहीर केले. जी-ट्वेंटीच्या तयारीसाठी पैशाचे बंधन नव्हते. संपूर्ण दिल्लीत रस्ते सुशोभित केले गेले. दिल्लीभर झाडे, कुंडय़ा, गवत, दिवे (आणि अधिक दिवे), शिल्पे आणि होर्डिंग्ज उभारले गेले. एका शहराच्या मानाने ही सगळी सजावट जरा जास्तच होती. इतकी की आता त्यामधले उरलेले साहित्य आपण रिओ डी जानेरोच्या पुढच्या वर्षीच्या बैठकीसाठी ते शहर सजवायला देऊन टाकू शकतो. सगळय़ा होर्डिंगवर, सगळीकडे फक्त एकच चेहरा होता. या कार्यक्रमाला आलेल्या इतर नेत्यांना कोणत्याही होर्डिंगमध्ये थोडेसेदेखील स्थान दिले गेले नाही. कोणत्याही घोषणापत्रामध्ये असतात, तशा दिल्ली घोषणापत्रामध्ये (दिल्ली डिक्लेरेशन) काही उदात्त घोषणा होत्या. उदाहरणार्थ ‘आपण अशा एका निर्णायक क्षणी भेटून इतिहास घडवतो आहोत.

आपण आत्ता घेतलेले निर्णय आपल्या पुढच्या पिढय़ांचे आणि आपल्या पृथ्वीच्या भविष्याला दिशा देणारे आहेत.’ मागच्या परिषदेतही हेच शब्द वापरले गेले होते आणि पुढच्या बैठकीतही हेच शब्द वापरले जातील याची मला खात्री आहे. युक्रेनमधील युद्धाचा उल्लेख करताना ‘युक्रेनवरील हल्ला’ असे न म्हणता त्याचे वर्णन करण्यासाठी योग्य शब्द शोधले गेले. रशिया आणि अमेरिका (आणि तिची मित्रराष्ट्रे) यांनीदेखील हे शब्द स्वीकारले ही एक मोठी गोष्ट होती. अध्यक्ष पुतिन आणि राष्ट्राध्यक्ष क्षी यांच्या अनुपस्थितीमुळे कदाचित हे घडू शकले असावे. जी- ट्वेंटीशी संबंधित आर्थिक प्रश्नांचा उल्लेख करता यावा यासाठी प्रत्येकाला युक्रेनचा मुद्दा दूर ठेवायचा होता, असे माझे मत झाले. व्यापार आणि गुंतवणुकीसाठी सर्वासाठी अनुकूल वातावरण निर्माण व्हावे आणि वेगवेगळय़ा देशांमध्ये असलेले वेगवेगळे वाद मिटवण्यासाठी २०२४ पर्यंत एक चांगली व्यवस्था उभी केली जावी यासाठी जागतिक व्यापार संघटनेकडे ठोस निर्धार व्यक्त करण्यात आला. २०१९ मधल्या ‘ट्रम्प टँट्रम’नंतर, हा एक स्वागतार्ह निर्धार आहे. एखाद्याचे मत वळवू शकणाऱ्या जागतिक आरोग्य संघटनेच्या महासंचालक नागोझी ओकोंजा इवेला यांच्या उपस्थितीचा हा परिणाम असावा. श्रमशक्तीच्या सहभागातील दरी कमी करण्यासाठी वचनबद्धतेची हमी देणे, सर्वासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, स्त्री-पुरुषांच्या वेतनातील भेदभाव संपवणे, लैंगिक हिंसा, छळ, भेदभाव आणि महिलांवरील अत्याचारांसह लिंग-आधारित हिंसा नष्ट करणे, स्त्रियांसाठी कामाच्या ठिकाणी सुरक्षितता असेल याची हमी देणे, लैंगिक भेदभाव कायम राखणाऱ्या साचेबंद कल्पना आणि पूर्वग्रह नष्ट करणे यासाठी काम करण्याची हमी देण्यात आली. धर्म किंवा श्रद्धेच्या नावाखाली चालणारा परकीयांबद्दलचा विद्वेष, वर्णद्वेष आणि इतर प्रकारच्या असहिष्णुता तसेच दहशतवादाच्या सर्व प्रकारांच्या शांततेसाठी असलेली सर्व धर्मांची बांधिलकी लक्षात घेऊन निषेध करण्यात आला.हे घोषणापत्र ३४ पानांचे आहे. त्यात ८३ परिच्छेद आहेत. पण या सगळय़ामध्ये मिळून काय होते, तर मागच्या घोषणापत्रांमधले निष्कर्ष आणि सध्या सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती. याशिवाय त्यात काहीच नव्हते. जी-ट्वेंटी देशांमध्ये भारताला प्रबळ स्थान प्राप्त झाले आहे आणि २०२३ मधले भारताचे जी-ट्वेंटीचे अध्यक्षपद ही एक ऐतिहासिक घटना होती, असा सरकारने दावा केला आणि प्रसारमाध्यमांनीही आपली निष्ठा दाखवत तसेच वृत्त दिले.

## संपादकीय »

# आरक्षणाची लढाई

***आर्थिक हितसंबंध नसलेला सामान्य कार्यकर्ता कसा निर्धाराने लढतो, हे मनोज जरांगे-पाटील यांच्या या उपोषणाने दाखवून दिले.***

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे-पाटील यांनी सुरू केलेले बेमुदत उपोषण सतराव्या दिवशी मागे घेतल्यामुळे सरकारपुढे निर्माण झालेला एक गंभीर प्रश्न तात्पुरता का होईना निकालात निघाला. कोणत्याही प्रकारचे राजकीय, आर्थिक हितसंबंध नसलेला सामान्य कार्यकर्ता कसा निर्धाराने लढतो, हे मनोज जरांगे-पाटील यांच्या या उपोषणाने दाखवून दिले. हे नेतृत्व सामाजिक पातळीवर काम करते की भविष्यात राजकीय मार्ग पत्करते, याचे उत्तर काळाच्या पातळीवर मिळेल. कारण, मराठा क्रांती मोर्चा म्हणून राज्यभरात अनेक मोर्चे निघाले, शांततामय मार्गाने निघालेल्या लाखोंच्या मोर्चांनी देशाच्याच नव्हे, तर जगाच्या पातळीवर एक आदर्श निर्माण केला. एवढे मोठे आणि दीर्घकाळचे आंदोलन होऊनही त्यातून कुणी नेता पुढे येऊ शकला नाही.

**कुठल्याही देशाच्या इतिहासात असे खूप कमी प्रसंग येतात, जेव्हा भव्य परिवर्तन पाहायला मिळते. २०१४ हे वर्ष भारताच्या राजकीय इतिहासात असेच भव्य परिवर्तनाचे वर्ष होते. त्यावेळी देशातील जनतेला अकार्यक्षम व भ्रष्ट प्रशासनापासून सुटका हवी होती; त्यांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाला परिवर्तनासाठी जनादेश दिला. २०१४ चा जनादेश परिवर्तनासाठी होता, तर २०१९ चा जनादेश परिवर्तनाच्या त्या प्रक्रियेतील विश्वासासाठी होता.**

# मोदी ‘विश्वगुरू’ आहेतच, कारण...



जनता जेव्हा एखाद्यावर विश्वास ठेवते, तेव्हा राजकीय व्यक्तीसाठी तो विश्वास धारण करणे एक मोठे आव्हान असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात असे अनेक निर्णय घेण्यात आले, जे भाजपाच्या वैचारिक अधिष्ठानाच्या विश्वासार्हतेचा आधार होते. त्यांना धाडस व दृढ निश्चय याची साथ देत मोदींनी ध्येयापर्यंत पोहोचवले. जनसंघाच्या काळापासून आतापर्यंत भाजपासाठी ही विश्वासार्हतेची कसोटी होती व मागील ९ वर्षांत मोदी त्या कसोटीवर शंभर टक्के खरे उतरले आहेत. त्यांनी भारताच्या सामान्य जनमानसात आपली व पक्षाची विश्वासार्हता वृद्धिंगत केली; तसेच प्रामाणिकपणे पाहिले तर भारताच्या राजकारणात विश्वासार्हतेच्या दृष्टीने मागील ९ वर्षे मोलाचे ठरले. राज्यस्तरावरून देशस्तरावर आणि देशस्तरावरून विश्वस्तरावर यांनी अविश्वसनीय छाप उमटविली आहे. भारत हे दक्षिण आशियातील एकमेव धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आता आपण एक जागतिक शक्ती म्हणून उदयाला आलो आहोत, हे भारताच्या अध्यक्षतेत नुकत्याच पार पडलेल्या ‘जी-२०’ परिषदेमध्ये सिद्ध झाले आहे. ‘वसुधैव कुटुंबकम– एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भवितव्य’ ही भावनाच भारताच्या जी-२० अध्यक्षतेखालील संकल्पनेत त्यांनी मांडली. विशेष म्हणजे त्यांनी ‘जी-२०’ परिषदेसाठी तयार केलेले घोषणापत्र परिषदेने सर्वानुमते मंजूर केले. त्यावेळी जगातील मतभेद आडवे आले नाहीत, तर दुसरे म्हणजे आफ्रिकी युनियनला ‘जी-२०’ परिषदेचे सदस्यत्व मोदी यांच्या नेतृत्वाखाली बहाल करण्यात आले. चांगला जागतिक संदेश देण्याचे, सर्व देशांना जोडून ठेवण्याचे आणि भारताची विश्वासार्ह प्रतिमा जगापुढे मांडण्याचे काम मोदींनी केले. म्हणूनच नरेंद्र मोदी यांना विश्वगुरू म्हटले जाते. २०व्या भारत-आसियान शिखर परिषदेतसुद्धा त्यांनी एक वेगळाच ठसा उमटवला. अमेरिका, रशिया, ब्रिटन, फ्रांस, कॅनडा, जर्मनी, इजराईल, युरोप, सौदी अरब, आफ्रिका अशा अनेक देशांना मोदींच्या नेतृत्वातील भारताशी मैत्री हवी आहे. भारताच्या चंद्रयान-३ ने २३ ऑगस्ट २०२३ ला चंद्रावरील दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग केलं. जगातील हा पहिला पराक्रम आहे, जो भारताने करून दाखवला. हा दिवस यापुढे ‘राष्ट्रीय अंतराळ दिवस’ म्हणून ओळखला जाईल, अशीही घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केली. चंद्रयान-३ नंतर सूर्ययान यशस्वीपणे प्रक्षेपित करून त्यांनी जगाला भारताच्या सामर्थ्याचा परिचय दिला आहे. १७ सप्टेंबर रोजी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आरोग्य मंत्रालय ‘आयुष्मान भव’ मोहीम राबवणार आहे. ही मोहीम अनेक अर्थाने विशेष आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# न्याय देवता आम्हाला नक्कीच न्याय देईल!

## आमचा उठाव कायदेशीरच संदीपान भुमरे यांनी व्यक्त केला विश्वास

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात 40 आमदारांनी केलेला उठाव कायदेशीरच असून श्री. गणेशाच्या आशिर्वादाने न्याय देवता आम्हाला नक्कीच न्याय देईल असा विश्वास रोजगार हमी योजना मंत्री संदीपान भुमरे यांनी रविवारी ता. 17 येथे व्यक्त केला आहे. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिना निमित्त ध्वजवंदन कार्यक्रमासाठी ते हिंगोलीत आले होते.**



यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी आमदार संतोष बांगर, युवासेना जिल्हा प्रमुख राम कदम यांची उपस्थिती होती यावेळी बोलतांना मंत्री भुमरे म्हणाले की, राज्यात 40 आमदारांनी उठाव केला असून शिवसेनेच्या18 पैकी 13 खासदारांनी उठाव केला आहे. आम्ही केलेला उठाव कायदेशीरच आहे. न्यायदेवतेवर आमचा पूर्ण विश्वास असून निकाल आमच्याच बाजूने लागेल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

संदीपान भुमरे म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्रकार परिषदेला ते का आले नाही, त्यांना कोणी रोखले होते, पत्रकार म्हणून ते येऊ शकले असते. ते काय बोलले याकडे लक्ष देण्याची गरज नाही. विरोध करणे या शिवाय त्यांना काहीही काम राहिलेले नाही. ते केवळ देखावा करण्याचे काम करतात तसेच शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांना खूश करण्यासाठी त्यांची नाटके असल्याचा आरोप भुमरे यांनी यावेळी केला. आता टीव्हीवर संजय राऊत दिसताच जनता चॅनल बदलू लागल्याचा आरोपही त्यांनी केला.

संदीपान भुमरे म्हणाले की, राज्यात हमी योजनेची कामे कधीही बंद राहात नाहीत. कामाची मागणी आल्यानंतर तातडीने काम देण्याची आमची भूमिका आहे. ज्या ठिकाणी कामाची मागणी आली त्या ठिकाणी मजूरांच्या हाताला काम देऊ असेही मंत्री भुमरे यांनी स्पष्ट केले.

छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मराठवाड्याला 46 हजार कोटी रुपये देण्यात आले असून मराठवाड्यातून विकास कामे होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### मुख्यमंत्री यांच्याकडे लक्ष देण्याची गरज नाही

संदीपान भुमरे म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पत्रकार परिषदेला ते का आले नाही, त्यांना कोणी रोखले होते, पत्रकार म्हणून ते येऊ शकले असते. ते काय बोलले याकडे लक्ष देण्याची गरज नाही. विरोध करणे या शिवाय त्यांना काहीही काम राहिलेले नाही. ते केवळ देखावा करण्याचे काम करतात तसेच शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांना खूश करण्यासाठी त्यांची नाटके असल्याचा आरोप भुमरे यांनी यावेळी केला. आता टीव्हीवर संजय राऊत दिसताच जनता चॅनल बदलू लागल्याचा आरोपही त्यांनी केला.

# मी फडणवीसांना मदत केली : खडसे

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

आपण प्रदेशाध्यक्ष होण्यासाठी फडणवीस यांना मोठी मदत केली म्हणून ते मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत येऊ शकले. पण, फडणवीसांनी व्यक्तीगतरित्या माझा छळ करण्याची भूमिका घेतली. हे मला योग्य वाटत नाही, अशी खंत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसे यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसे पुढे बोलताना म्हणाले की, देवेंद्र फडणवीसांना अनेक गोष्टी शिकवण्यात माझा हात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते एकनाथ खडसे यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. खडसे सातत्याने फडणवीस यांच्यावर टीका करत आहे. 2014 पूर्वी विधानसभेत मी जिथे बसायचो, त्याच्या पाठीमागील जागा मी फडणवीसांना दिली होती. विरोधी पक्षनेते असताना माझ्याऐवजी बोलण्याची संधी फडणवीसांना दिली. महाराष्ट्रातील अनेक प्रश्न त्यांनी उचलले. त्यांचे कौशल्यही त्यात होते, असे खडसे म्हणाले. एकनाथ खडसे म्हणाले की, फडणवीस यांना आपण मदत केली. मात्र, नंतरच्या कालखंडात फडणवीसांनी कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला. राजकारण राजकारणाच्या जागेवर आहे. पण, सुडाचे राजकारण महाराष्ट्राला शोभत नाही, अशा शब्दांत खडसे यांनी फडणवीसांना सुनावले आहे. एकनाथ खडसे म्हणाले की, विनोद तावडे, पंकजा मुंडे आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावरही अन्याय झाला का असे विचारले असता खडसे म्हणाले की, विनोद तावडे सावरले आहेत. ते महाराष्ट्रातून दिल्लीला गेले आहेत. पंकजा मुंडे संभ्रमावस्थेत आहेत. म्हणून त्यांनी अद्याप कोणता निर्णय घेतलेला नाही. मी निर्णय घेऊन वेगळी दिशा आणि मार्ग अवलंबला.

# उपोषण सोडवून कश्मीरला जावे!

## मुख्यमंत्र्याच्या दौऱ्यावर वडेट्टीवार यांची टीका

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुख्यमंत्र्यांनी देश, विदेश, राज्य फिरलं पाहिजे. मात्र राज्याची परिस्थिती लक्षात घेऊन फिरलं पाहिजे. राज्यात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढलं आहे. मराठवाड्यात दररोज तीन शेतकरी आत्महत्या करीत आहेत. राज्यात मराठा, ओबीसी समाजाचा उद्रेक होत असताना त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. 370 कलम हटविल्यानंतर मुख्यमंत्र्यांना काश्मीर आवडत असेल तर खुशाल जावे. त्या आधी उपोषण सोडवून जावे, अशी टीका विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली.**



### ओबीसी समाजाचा उद्रेक

राज्याची परिस्थिती लक्षात घेऊन फिरलं पाहिजे. राज्यात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण वाढलं आहे. मराठवाड्यात दररोज तीन शेतकरी आत्महत्या करीत आहेत. राज्यात मराठा, ओबीसी समाजाचा उद्रेक होत असताना त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. 370 कलम हटविल्यानंतर मुख्यमंत्र्यांना काश्मीर आवडत असेल तर खुशाल जावे. त्या आधी उपोषण सोडवून जावे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

दरम्यान विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, मराठ्यांना ओबीसी आरक्षणात समाविष्ट करू नये, या मागणीसाठी चंद्रपुरात सुरू असलेल्या आंदोलनाला आज विजय वडेट्टीवार यांनी भेट दिली. रवींद्र टोंगे हे मागील सोमवारपासून अन्नत्याग आंदोलन करीत आहेत. आज त्यांच्या भेटीला वडेट्टीवार आले होते. आज ओबीसी मोर्चाचे आयोजन केले गेले असून, त्यातही वडेट्टीवार सहभागी होणार आहेत. सोबत भाजप नेते आशीष देशमुख उपस्थित आहेत.

आठ दिवस उलटूनही या आंदोलनाची दखल न घेतल्याने ओबीसी बांधवांत असंतोष असून, हा लढा आणखी तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात काँग्रेस पक्षाची सत्ता आली तर वादग्रस्त वक्तव्य करणारे संभाजी भिडे या समाजात वळवळ करणाऱ्या किड्याला जेलमध्ये टाकून चक्की पिसिंग पिसिंग करायला लावणार, असे वक्तव्य राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले. काँग्रेस पक्ष तथा महात्मा गांधी व देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या नेत्यांबद्दल भिडे अतिशय खालच्या पातळीवर बोलून तेढ निर्माण करण्याचे काम करत आहेत.

या भिडे ऊर्फ समाजात लागलेल्या किड्याला जेलात चक्की पीसिंग पिसिंग करायला लावणार आहे. राज्यात काँग्रेस पक्षाची सत्ता आल्यानंतर हे आम्ही नक्की करू, असेही वडेट्टीवार म्हणाले.

# काँग्रेसला 5 राज्यांत बहुमताचा विश्वास!

## » ही वेळ आरामात बसण्याची नाही : मल्लिकार्जुन खरगे

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**हैदराबादेत काँग्रेस कार्यकारिणीची सुरू असलेली बैठक रविवारी म्हणजेच 17 सप्टेंबर रोजी संपली. यावेळी 14 कलमी प्रस्ताव मंजूर करण्यात आला. वर्षअखेरीस 5 राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत पक्षाला बहुमत मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, मिझोराम आणि तेलंगाणात वर्षाच्या शेवटी निवडणुका होणार आहेत.**



निवडणूक राज्यांच्या अध्यक्षांनीही बैठकीत सादरीकरण केले. यामध्ये निवडणुकीची रणनीती, प्रचार आणि तयारी स्पष्ट करण्यात आली. देशातील जनतेला परिवर्तन हवे असून आगामी निवडणुकीसाठी काँग्रेसची पूर्ण तयारी असल्याचे या ठरावात म्हटले आहे. कायदा आणि सुव्यवस्था, स्वातंत्र्य, सामाजिक-आर्थिक आणि समानता याबाबत जनतेच्या अपेक्षा पक्ष पूर्ण करेल. बैठकीच्या दुसऱ्या दिवशी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी काँग्रेस नेत्यांना निवडणुकीसाठी तयार राहण्याचा सल्ला दिला. तो म्हणाला- ही वेळ आरामात बसण्याची नाही. दिवसरात्र मेहनत करावी लागेल. जिथे जिथे राज्य सरकारे आहेत, तिथे त्यांच्या चांगल्या कामांचा प्रचार करावा लागेल. सोनिया गांधी यांनी काँग्रेस नेत्यांना मीडियापासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे. काँग्रेसला नुकसान पोहोचेल अशी कोणतीही टिप्पणी करणे टाळावे, असे त्यांनी पक्षातील लोकांना सांगितले आहे. तेलंगणातील तुक्कुगुडा येथे आज काँग्रेसची रॅली होणार असून त्यात पक्ष तेलंगणासाठी 5 गॅरंटी जाहीर करणार आहे. खरगे म्हणाले- आजचा दिवस ऐतिहासिक आहे. 1948 मध्ये या दिवशी हैदराबादला स्वातंत्र्य मिळाले. नेहरू आणि सरदार पटेल यांनी हैदराबाद मुक्त केले. CWC बैठकीनंतर काँग्रेस पत्रकार परिषद घेणार आहे. खरगे म्हणाले की, या बैठकीचा अजेंडा राज्याच्या विधानसभा निवडणुका आणि 2024 च्या लोकसभा निवडणुकीची तयारी आहे. बैठकीच्या पहिल्या दिवशी मल्लिकार्जुन खरगे म्हणाले- महागाई, बेरोजगारी, मणिपूर हिंसाचार आणि असमानता रोखण्याच्या मुद्द्यांवर मोदी सरकार पूर्णपणे अपयशी ठरत आहे. अलीकडील हिंसक घटनांनी भारताच्या आधुनिक, पुरोगामी आणि धर्मनिरपेक्ष प्रतिमेला धक्का बसला आहे. भाजप आगीत तेल ओतत आहे. बैठकीपूर्वी सोनिया गांधींनी ट्विटरवर लिहिले - काँग्रेस नेहमीच तेलंगणातील लोकांच्या बाजूने उभी राहिली आहे. राज्याला प्रगतीच्या नव्या टप्प्यावर नेण्याची हीच वेळ आहे. तेलंगण आणि देशाच्या विकासाचा नवा अध्याय लिहिण्यासाठी काँग्रेस कार्यकारिणी सज्ज झाली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी 20 ऑगस्ट रोजी काँग्रेस कार्यकारिणीची (CWC) घोषणा केली होती.

### ...ते आपले शत्रू नाही

» काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीपूर्वी काँग्रेस नेते पवन खेडा यांनी 14 टीव्ही अँकरवर बहिष्कार टाकण्याच्या भारत आघाडीच्या निर्णयावर स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले- आम्ही कोणावरही बंदी, बहिष्कार किंवा काळ्या यादीत टाकलेले नाही. याला तुम्ही असहकार आंदोलन म्हणू शकता काँग्रेस नेते म्हणाले- कोणी समाजात द्वेष पसरवत असेल तर आम्ही त्यात सहयोगी बनणार नाही. त्यांना तसे करण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र, ते आपले शत्रू नाही. उद्या त्यांना त्यांची चूक कळली तर आम्ही त्यांच्या शोला जाऊ.

# आयुष्मान योजनेचा तिसरा टप्पा सुरू!

## » 5 लाख रुपयांचा आरोग्य विमा मिळेल!

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आयुष्मान योजनेचा तिसरा टप्पा (आयुष्मान 3.0) 17 सप्टेंबरपासून सुरू झाला आहे. तिसऱ्या टप्प्यात कार्ड बनवण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. यावेळी तुम्ही स्वतःची ऑनलाइन नोंदणी करून बनवलेले आयुष्मान कार्ड मिळवू शकाल. या वेळी स्व-नोंदणी मोडमध्ये, लाभार्थ्यांना पडताळणीसाठी OTP, आयरिस आणि फिंगरप्रिंट आणि चेहरा-आधारित सत्यापन पर्याय असतील. स्मार्टफोनच्या माध्यमातून घरबसल्या नोंदणी करता येणार आहे. यासाठी लोकांना त्यांच्या मोबाईलवर आयुष्मान कार्ड ॲप वापरावे लागेल.**



### या योजनेत सर्व आजारांचा समावेश आहे

» या योजनेत जुनाट आजारांचाही समावेश करण्यात आला आहे. कोणत्याही आजारासाठी रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी आणि नंतरचा खर्च कव्हर केला जातो. यामध्ये वाहतुकीवरील खर्चाचा समावेश होतो. यामध्ये सर्व वैद्यकीय चाचण्या, ऑपरेशन्स, उपचार इत्यादी गोष्टींचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत 5.5 कोटींहून अधिक लोकांनी उपचार घेतले आहेत.

यासाठी लाभार्थीच्या नावाने आयुष्मान कार्ड जारी केले जाते. या कार्डाच्या मदतीने लाभार्थ्यांना योजनेंतर्गत सूचीबद्ध असलेल्या सरकारी आणि खाजगी रुग्णालयांमध्ये 5 लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार मिळू शकतात. आयुष्मान कार्ड बनवण्यासाठी केंद्र सरकारने मोबाईल फोनवरही आयुष्मान कार्ड ॲपद्वारे अर्ज करण्याची सुविधा दिली आहे. ॲप डाऊनलोड केल्यानंतर लाभार्थीला मोबाईल क्रमांकाच्या मदतीने नोंदणी करावी लागेल. यानंतर, नोंदणी प्रक्रिया ओटीपी, आयरिस आणि फिंगरप्रिंट आणि फेस-आधारित व्हेरिफिकेशनच्या मदतीने पूर्ण करावी लागेल. येथे तुम्हाला रेशन कार्ड, आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, पासपोर्ट आकार फोटो, पॅन कार्ड किंवा इतर आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी लागतील. यानंतर, तुमच्या विनंतीची पडताळणी केल्यानंतर सरकार तुमचे नाव योजनेत नोंदणी करेल. तथापि, या प्रक्रियेपूर्वी, आपण त्यासाठी पात्र आहात की नाही हे तपासावे. या योजनेसाठी काही पात्रता निकष विहित करण्यात आले आहेत. ही पात्रता असलेले लोक आयुष्मान कार्ड बनवण्यासाठी अर्ज करू शकतील. आयुष्मान योजनेसाठी पात्रता तपासण्यासाठी तुम्ही 14555 वर कॉल करू शकता.

# ईडीच्या माजी संचालकांना नवी जबाबदारी मिळू शकते

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

अंमलबजावणी संचालनालयाचे (ईडी) माजी प्रमुख संजय मिश्रा यांना नवी जबाबदारी मिळू शकते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मिश्रा यांना सेंट्रल इकॉनॉमिक इंटेलिजन्स ब्युरो (CEIB) मध्ये नेले जाण्याची शक्यता आहे. CEIB महसूल विभागाच्या अंतर्गत काम करते. इंटेलिजन्स ब्युरो (IB), महसूल गुप्तचर संचालनालय, CBI, संशोधन आणि विश्लेषण शाखा (RAW) आणि इतर एजन्सी यांच्यात समन्वय राखणे हे त्याचे काम आहे.

CEIB आर्थिक आणि आर्थिक गुन्ह्यांची माहिती संकलित आणि देखरेख करते. संजय मिश्रा येथे आल्याने त्यांच्या अनुभवाचा फायदा ब्युरोला घेता येणार आहे. मिश्रा यांचा ईडी संचालक म्हणून कार्यकाळ 15 सप्टेंबर रोजी संपला. यापूर्वी अशी चर्चा होती की ईडी आणि सीबीआयची संयुक्त एजन्सी तयार करून मिश्रा यांच्यावर काही महत्त्वाची जबाबदारी सोपवली जाऊ शकते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यात केवळ कायदेशीर अडथळेच नव्हते, तर सीबीआयमध्येही एकमत नव्हते. सीबीआय दिल्ली पोलिस विशेष कायद्यांतर्गत काम करते, नवीन पोस्ट तयार करण्यासाठी संसदेत विधेयक मंजूर करावे लागते.

संजय मिश्रा यांच्या निवृत्तीनंतर राहुल नवीन यांची ईडीचे अंतरिम संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राहुल हे मूळचे बिहारचे असून ते 1993 च्या बॅचचे आयआरएस अधिकारी आहेत. ते मुख्य दक्षता अधिकारी आणि ईडी मुख्यालयाचे विशेष संचालक आहेत. नवीन संचालकाची औपचारिक नियुक्ती होईपर्यंत ते संचालकपदाची जबाबदारी सांभाळतील. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की सरकार कायदा करून कार्यकाळ वाढवू शकते, परंतु अध्यादेशाद्वारे तसे करणे कायदेशीर नाही.

# कुटुंब आणि मित्रांसोबत गेट टुगेदर पार्टी!

परिणीती चोप्रा आणि आपचे खासदार राघव चड्ढा यांच्या लग्नाचे कार्यक्रम वेगवेगळ्या शहरात होणार आहेत. हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, राघव-परिणितीच्या लग्नाचे कार्यक्रम 17 सप्टेंबर रोजी दिल्लीत अरदास आणि शब्द कीर्तन (शीख धर्माची प्रार्थना) सह सुरू होतील. यानंतर हे जोडपे लग्नासाठी उदयपूरला जाणार आहेत. यानंतर चंदीगडमध्ये रिसेप्शन पार्टी होणार आहे. चंदीगडनंतर हे कपल दिल्लीतही रिसेप्शन पार्टी देणार आहे. हिंदुस्तान टाईम्सच्या वृत्तानुसार, 17 सप्टेंबर रोजी दिल्लीत अरदास आणि शब्द कीर्तनानंतर गेट-टूगेदर पार्टी होणार आहे. राघव-परिणितीचे कुटुंबीय आणि जवळचे मित्र या पार्टीत सहभागी होणार आहेत. यानंतर दोघेही कुटुंबासह उदयपूरला जाणार आहेत. लग्नाच्या सर्व फंक्शन्समध्ये जोडप्याच्या कपड्यांप्रमाणेच पेस्टल आणि पर्ल व्हाइट थीमची सजावट पाहायला मिळेल. परिणीती आणि राघव यांना ही रंग आणि सजावटीची थीम आवडली आहे. लग्नातही हे जोडपे सारख्याच रंगाचे को-ऑर्डिनेटेड कपडे परिधान करताना दिसणार आहेत. रिपोर्टनुसार, परिणीतीने जवळपास सर्व फंक्शन्समध्ये कोणते कपडे घालायचे हे ठरवले आहे, तर राघवचे पोशाख अजून ठरलेले नाहीत. पाहुण्यांची यादीही अंतिम करण्यात आली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, राज्यसभा सदस्य कपिल सिब्बल, आपचे खासदार संजय सिंह आणि काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते अभिषेक मनू सिंघवी यांनाही या लग्नाचे निमंत्रण देण्यात आले आहे. या लग्नाला बॉलिवूड इंडस्ट्रीतील दिग्गज कलाकारही हजेरी लावणार आहेत.



# प्राजक्ता कोळीचा साखरपुडा

मिसमॅच्ड फेम अभिनेत्री प्राजक्ता कोळीने तिचा दीर्घकाळापासूनचा बॉयफ्रेंड वृशांक खनालसोबत एंगेजमेंट केली आहे. या जोडप्याने रविवारी एक फोटो पोस्ट करून चाहत्यांसोबत ही आनंदाची बातमी शेअर केली. प्राजक्ताने तिच्या इंस्टाग्राम पोस्टवर लिहिले- 'वृशांक आता माझा बॉयफ्रेंड नाही'. शेअर केलेल्या फोटोमध्ये प्राजक्ता आणि वृषांक त्यांच्या एंगेजमेंट रिंग्ज फ्लॉंट करताना दिसत आहेत. प्राजक्ता आणि वृशांकच्या या सोशल मीडिया पोस्टवर चाहते आणि सेलेब्स तीव्र प्रतिक्रिया देत आहेत. 'नेव्हर हॅव आय एव्हर' अभिनेत्री मैत्रेयी रामकृष्णन हिने कमेंटमध्ये लिहिले - अभिनंदन. अनिल कपूरने लिहिले- 'तुम्हा दोघांचे खूप अभिनंदन, जुग जुग जियो.' प्राजक्ताच्या ऑनस्क्रीन भावाची भूमिका करणाऱ्या वरुण धवननेही मनापासून प्रतिक्रिया दिली. याशिवाय सुनील शेट्टी, भूमी पेडणेकर, अरमान मलिक, बरखा सिंग, भारती सिंग आणि गौहर खान यांच्यासह अनेक सेलिब्रिटींनी या जोडप्याला त्यांच्या लग्नासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# रुबिना दिलायक होणार आहे आई



अभिनेत्री रुबिना दिलायक आई होणार आहे. अलिकडेच तिने तिचा पती आणि अभिनेता अभिनव शुक्लासोबतचा एक फोटो सोशल मीडियावर पोस्ट करून ही माहिती दिली. सध्या रुबिना आणि अभिनव शुक्ला अमेरिकेत सुट्टी घालवत आहेत. या फोटोत रुबिनाचा बेबी बंपही स्पष्ट दिसत आहे. जॉइंट पोस्ट शेअर करताना अभिनव आणि रुबिनाने लिहिले - आम्ही डेटिंग करायला सुरुवात केली तेव्हा आम्ही एकमेकांना वचन दिले होते की संपूर्ण जग फिरू. आम्ही लग्न केले आणि आता आम्ही एक कुटुंब म्हणून आमचा नवीन प्रवास सुरू करत आहोत. लवकरच आमच्यासोबत एक छोटा प्रवासीही असेल. या पोस्टवर अभिनेत्री सृती झा हिने या जोडप्याचे अभिनंदन केले आहे. सिंपल कौल यांनी पोस्टवर लिहिले आहे- वाढदिवसाच्या शुभेच्छा! ही खूप चांगली बातमी आहे. तुम्हा दोघांना खूप खूप प्रेम! सोशल मीडिया यूजर्सनीही या पोस्टर जोडप्याला शुभेच्छा दिल्या आहेत. एका यूजरने लिहिले- शेवटी तुम्ही प्रेग्नेंसीची अधिकृत घोषणा केली आहे. तुम्हा दोघांचेही खूप खूप अभिनंदन! रुबिना 4 महिन्यांची गरोदर आहे आणि तिच्या बाळाची पुढील वर्षी प्रसूती होऊ शकते. अभिनव शुक्लाने 2018 मध्ये शिमला येथे त्याची दीर्घकाळाची मैत्रीण रुबिनासोबत लग्न केले. अभिनेत्री रुबिना दिलायक आई होणार आहे. अलिकडेच तिने तिचा पती आणि अभिनेता अभिनव शुक्लासोबतचा एक फोटो सोशल मीडियावर पोस्ट करून ही माहिती दिली.



# माधुरी साकारणार सरोज खान यांची भूमिका!

दिवंगत कोरिओग्राफर सरोज खान यांच्या जीवनावर बायोपिक बनवला जाणार आहे. निर्माता भूषण कुमार यांनी नुकतेच याला दुजोरा दिला आहे. आता या मालिकेतील मुख्य अभिनेत्रीबाबत एक अपडेट समोर आले आहे. माधुरी दीक्षितला कोरिओग्राफर सरोज खानच्या भूमिकेत कास्ट करण्याचा विचार निर्माते करत असल्याच्या बातम्या आहेत. कोरिओग्राफर सरोज खान यांच्या मुलीनेही बायोपिकमध्ये माधुरी दीक्षितच्या कास्टिंगबद्दल म्हटले आहे. माधुरी दीक्षितने या बायोपिकचा भाग व्हावे असे त्यांना वाटते. बायोपिकबाबतही त्यांनी आपली भूमिका मांडली आहे. सरोज खानच्या बायोपिकसाठी अद्याप कोणत्याही अभिनेत्रीचे नाव फायनल झालेले नाही. मात्र, निर्माते माधुरी दीक्षितला कास्ट करण्याचा विचार करत आहेत. सरोज जींच्या आयुष्यातील वेगवेगळे टप्पे दाखवण्यासाठी निर्माते वेगवेगळ्या वयोगटातील कलाकारांच्या शोधात आहेत. सरोज खानवर बनत असलेला हा बायोपिक सध्या लेखनाच्या टप्प्यात आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या बायोपिकमध्ये बरेच काही समाविष्ट आहे, सरोज खानचे आयुष्य अनेक चढ-उतारांनी भरलेले आहे. अशा परिस्थितीत बायोपिकच्या माध्यमातून ते पडद्यावर दाखवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. अशा परिस्थितीत कथेचा कोणता अँगल दाखवायचा हे निर्माते अजूनही ठरवत आहेत. मीडियाशी संबंधित आणखी एका सूत्राने सांगितले- 6 महिन्यांपूर्वी माधुरी दीक्षितला लीड म्हणून कास्ट करण्याची चर्चा होती. तिच्याशी संपर्क करण्यात आला. या व्यक्तिरेखेसाठी ती योग्य निवड आहे.

# भारताचा आशिया चषकावर सि'राज'!

## भारताने श्रीलंकेचा 10 गडी राखून केला पराभव

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**टीम इंडियाने ८व्यांदा आशिया चषकाचे विजेतेपद पटकावले आहे. कोलंबोच्या आर प्रेमदासा स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात भारताने श्रीलंकेचा 10 गडी राखून पराभव केला. सामन्याच्या उरलेल्या चेंडूंच्या बाबतीत भारताचा हा सर्वात मोठा विजय आहे. संघाने 263 चेंडू शिल्लक असताना विजय मिळवला. यापूर्वी टीम इंडियाने 2001 मध्ये केनियाचा 231 चेंडू राखून पराभव केला होता.**



### आशिया चषकातील अंतिम सामन्यातील विजयाचे हिरो



**8** वेळा टीम इंडियाने आशिया चषकाचे विजेतेपद पटकावले

**6** मोहम्मद सिराज: 6 विकेट घेतल्या

**3** हार्दिक पंड्या : 3 विकेट घेतल्या

**27** शुभमन गिल नाबाद २७ रन

**23** ईशान किशन नाबाद २३ रन

अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून फलंदाजी करणाऱ्या श्रीलंकेचा संघ 15.2 षटकांत सर्वबाद 50 धावांवर आटोपला. प्रत्युत्तरात टीम इंडियाने 6.1 षटकात 51 धावा करत विजय मिळवला. भारताने कमीत कमी चेंडू खेळून लक्ष्याचा पाठलाग करण्याचा विक्रमही सुधारला आहे. फलंदाजीत केवळ 37 चेंडू खेळून टीम इंडियाने सामना जिंकला. यापूर्वीचा विक्रम 69 चेंडूंचा होता. इतके चेंडू खेळून भारताने 2001 मध्ये केनियाचा पराभव केला होता.

श्रीलंकेकडून कुसल मेंडिसने सर्वाधिक 17, दुसन हेमंथाने नाबाद 13 धावा केल्या. या दोघांव्यतिरिक्त श्रीलंकेच्या कोणत्याही फलंदाजाला दुहेरी धावसंख्या गाठता आली नाही. भारताकडून मोहम्मद सिराजने 6, हार्दिक पंड्याने 3, जसप्रीत बुमराहने 1 विकेट घेतली. सिराजने चौथ्या षटकात 4 विकेट घेत श्रीलंकेचे कंबरडे मोडले. त्याआधी बुमराहने पहिल्याच षटकात श्रीलंकेला पहिला झटका देत कुसल परेराला आऊट केले. तर शेवटी हार्दिकने तीन गडी बाद करत लंकेचा डाव गुंडाळला. भारताविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यातील कोणत्याही संघाची ही सर्वात कमी धावसंख्या आहे. यापूर्वी एकदिवसीय सामन्यात बांगलादेशची भारताविरुद्ध सर्वात कमी धावसंख्या होती. बांगलादेशचा संघ 2014 मध्ये 58 धावांत ऑलआऊट झाला होता. एकदिवसीय क्रिकेटमधील सर्वात कमी धावसंख्येचा विक्रम झिम्बाब्वेच्या नावावर आहे. झिम्बाब्वेचा संघ 2004 मध्ये श्रीलंकेविरुद्ध 35 धावांत ऑलआऊट झाला होता. श्रीलंकेचे फलंदाज भारतीय वेगवान गोलंदाजांविरुद्ध झुंजताना दिसले. संघाच्या एकाही फलंदाजाला 20 धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. कुसल मेंडिसने सर्वाधिक 17 धावांची खेळी केली, तर दुसन हेमंथाने 13 धावांची खेळी केली. पॉवरप्लेमध्ये श्रीलंकेचा डाव फसला. संघाने 10 षटकांत 33 धावांत 6 विकेट गमावल्या. सिराजने 5 तर बुमराहने एक विकेट घेतली. संघाचा एकही फलंदाज दुहेरी आकडा गाठू शकला नाही, अशी परिस्थिती होती. मोहम्मद सिराजने एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात कमी चेंडूत 5 बळी घेण्याच्या विश्वविक्रमाची बरोबरी केली आहे. सिराजने 16 चेंडूत 5 विकेट्स घेतल्या. श्रीलंकेच्या चमिंडा वासने 2003 मध्ये बांगलादेशविरुद्ध 16 चेंडूत 5 विकेट घेतल्या होत्या. प्रथम खेळायला आलेल्या श्रीलंकेच्या संघाची सुरुवात खराब झाली. अवघ्या 12 धावांवर संघाने सहावी विकेट गमावली. सलामीवीर कुसल परेरा, कर्णधार दासुन शनाका, सदीरा समरविक्रमा आणि चरिथ असालंका शून्यावर बाद झाले, तर पथुम नसांका 2 आणि डी सिल्वा 4 धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतले.



### आशिया चषकातील सर्वोत्तम गोलंदाज

» भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज याने २१ धावा देत सहा विकेट घेतल्या. श्रीलंकेविरुद्धचा तो सर्वोत्तम भारतीय गोलंदाज ठरला आहे. सिराजने पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज वकार युनूसला पिछाडीवर टाकले आहे. वकार युनूस याने १९९० मध्ये श्रीलंकेविरुद्ध 26 धावा देत सहा विकेट घेतल्या होत्या.

### नामुष्कीजनक विक्रमाची नोंद

» आशिया चषक अंतिम सामन्यात श्रीलंकेचा संघ 15.2 षटकांत 50 धावांत सर्वबाद झाला. श्रीलंकेचा संघ कमी षटकांत सर्वबाद होण्याच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. कोणत्याही एकदिवसीय स्पर्धेच्या अंतिम सामन्यातीही ही निच्चांकी धावसंख्या ठरली आहे.

### श्रीलंकेने बांगलादेशला मागे टाकले

» भारताविरुद्ध सर्वात कमी धावसंख्या करणारा संघ आता श्रीलंका बनला आहे. या बाबतीत बांगलादेशला मागे टाकले. बांगलादेशी संघाने भारताविरुद्ध २०१४ मध्ये मीरपूरच्या मैदानावर ५८ धावा केल्या होत्या. ५० धावा ही वनडे फायनलमधील सर्वात कमी धावसंख्या ठरली आहे.